# पेरू - भाग १
# कुस्को



दक्षिण अमेरिकेतील एखादं पर्यटनस्थळ पहावं असं आमच्या मनात चाललं होत. आता दक्षिण अमेरिका म्हटलं की ब्राझिलचं रिओ-डी-जानिरो, रेनफॉरेस्ट, इग्वासु फॉल्स, आर्जेंटिनाचं वेनोस आयरेस, चिलीतील सांतियागो ही ठिकाणं मनात येतात. आम्ही क्रुझची माहितीही गोळा करत होतो. ब्राझिलला जायचं जवळपास पक्कंही झालं होतं आणि तितक्यात माझ्या मुलाने - ओमने 'माचु पिचू पाहूया' अशी टूम काढली.

माचु पिचू हे पेरूत आहे, (पेरू हा देश दक्षिण गोलार्धात, दक्षिण अमेरिकेत आहे), माचु पिचूत जगातल्या सात आश्चर्यांपैकी असलेले इंका संस्कृतीचे अवशेष आहेत, पेरूची राजधानी लिमा आहे आणि पेरूत लामा नावाचे प्राणी असतात (एका टिनटिन कॉमिकमध्ये हे लामा, कॅप्टन हॅडॉक या पात्राच्या तोंडावर सतत चूळ टाकतात) या तीन-चार गोष्टींपलीकडे आम्हाला माचु पिचू किंवा पेरूबद्दल काही विशेष माहिती नव्हती. परंतु ओमने (त्याच्या वाचनात आलेल्या थोड्याशा माहितीवरून) घोशा लावला म्हणून मी इंटरनेटवर शोधलं आणि माचु पिचूबद्दल जी माहिती, छायाचित्रं पाहिली ती खरोखरच फारच interesting वाटली. आणि अगदी शेवटच्या क्षणी ब्राझिल रद्द करून 'बालादपि सुभाषितं ग्राह्यं' या वचनाप्रमाणे आम्ही पेरूवर

शिक्कामोर्तब केलं.

पेरू हे फार लोकप्रिय पर्यटनस्थळ नसावं. त्यामुळे आमच्या ओळखीत तरी तिथे गेलेलं कोणी सापडेना. पूर्वी आम्ही युरोपला जात होतो तेव्हा न विचारता आम्हाला भरपूर सल्ले मिळत होते. परंतु पेरूच्या बाबतीत आम्ही विचारत असून सुद्धा काहीच माहिती/सल्ले मिळत नव्हते. ('पेरूला जाऊन चिकू खाणार आहात का ?' या प्रकारचे विनोद बरेच ऐकायला मिळाले.) अर्थात इंटरनेटवर संपूर्ण माहिती होतीच आणि त्या आधारेच आम्ही ही ट्रिप आखली.

पेरूत आम्हाला बघायचं असलेलं मुख्य आकर्षण होतं माचु पिचू. पण तिथे आंतरराष्ट्रीय विमानतळ तर सोडाच, पण देशांतर्गत विमानतळदेखील नव्हतं. पेरूची राजधानी लिमा. तिथे अर्थातच आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे, पण इंटरनेटवर तरी लिमात करण्याजोगं विशेष काही दिसेना. आणि लिमाहून माचु पिचूला जाणं देखील कठीण वाटलं. वेगवेगळ्या पर्यटन आयोजकांच्या वेबसाईट्सवर आणखी एक महत्त्वाचं ठिकाण दिसत होतं, ते म्हणजे कुस्को. ('कुस्को पेरू'वरही काही मालवणी विनोद झाले.) कुस्कोतील वेगवेगळ्या सहलींची माहिती तर आम्हाला आवडलीच, शिवाय तिथून माचु पिचूला जायचेदेखील बरेच पर्याय दिसले. म्हणून आम्ही कुस्कोतच मुक्काम करायचं ठरवलं.




**'बुटिक कासा सान ब्लास'**

कुस्को शहराच्या सान ब्लास नामक उपनगरातलं 'बुटिक कासा सान ब्लास' हे हॉटेल आम्ही निवडलं होतं. खरं म्हणजे आम्ही फार उशीरा बुकिंग करत असल्याने फारसे पर्याय उपलब्ध नव्हते. ह्या हॉटेलात देखील आम्हाला हवी होती तशी family suite with kitchen एकच उरली होती. ती आम्ही घाईघाईने बुक केली. त्यानंतर हॉटेलच्या ऑफिसमध्ये काम करणाऱ्या मारिया नावाच्या मुलीने आमच्यासाठी खाजगी टुर्सदेखील बुक केल्या. आश्चर्य म्हणजे त्यांच्या किंमती बाहेर उपलब्ध असलेल्या पब्लिक टुर्स इतक्याच निघाल्या. शिवाय या सगळ्या पॅकेजमध्ये विमानतळ ते हॉटेल जाता-येतानाची ride देखील

included होती.

कुस्कोतही आंतरराष्ट्रीय विमानतळ नव्हतं, पण देशांतर्गत विमानतळ होतं. त्यामुळे आम्ही न्यू यॉर्कच्या जे. एफ. के. विमानतळावरून लिमाला गेलो. हे ८ तासांचं डायरेक्ट फ्लाईट होतं. तिथून लगेचच कुस्कोचं कनेक्टिंग फ्लाईट होतं. हे लिमा-कुस्को फ्लाईट एकाच तासाचं आहे. कुस्कोला विमानतळातून बाहेर आल्या आल्या आम्ही सगळे, लामा कुठे दिसतात का ते शोधू लागलो. (म्हणजे भारतात आलेल्या परदेशी पाहुण्यांनी विमानतळाबाहेर लगेच हत्ती शोधायला लागावं तसं.) तेव्हा प्रत्यक्ष ते प्राणी दिसले नाहीत तरी एका मोठ्या होर्डिंगवर लामाचं चित्र दिसलं.

विमानतळाबाहेर आम्हाला न्यायला मारिया, हॉटेलची गाडी आणि ड्रायव्हर आले होते. कुस्कोतल्या आमच्या मुक्कामात हीच गाडी आणि हाच ड्रायव्हर सर्व टूर्समध्ये आणि कुस्को विमानतळावर परत येताना आमच्या बरोबर होते. प्रत्येक टूरसाठी गाईड मात्र वेगळा होता. ही गाडी म्हणजे चांगला प्रशस्त मर्सिडीझ कोच होता. लिमा विमानतळावर सर्व कामं पटपट होणं, कुस्को विमानतळावर मारियाने स्वागताला येणं, मारिया व ड्रायव्हर यांचं अगत्यशील, प्रसन्न, खेळीमेळीचं आणि तरीही अदबशीर वागणं, टूर्सचं चांगलं पॅकेज, टूरसाठी मिळालेली ऐसपैस गाडी या सर्वांमुळे आमचं पेरुबद्दल प्रथमदर्शनीच छान मत झालं. आणि नंतरही ते फारसं बदललं नाही.



विमानतळापासून आमचं हॉटेल दहा-पंधरा मिनिटांवर होतं. वाटेत थोडं कुस्को शहराचं दर्शन झालं. आम्ही सान ब्लासमध्ये शिरलो आणि एका छोट्याशा पण टुमदार जागी आल्याची जाणीव झाली. गाडीतून आम्हाला छोटी छोटी बैठी घरं, छोटी दुकानं दिसत होती. इंटरनेटवर पाहिलेली काही हॉटेल्ससुद्धा लागत होती. ती फार मोठी वाटत नव्हती. तिथलं एक पंचतारांकित हॉटेल मोनॅस्टेरिओ देखील बाहेरून तरी फार मोठं किंवा पंचतारांकित वाटलं नाही. नंतर तर अतिशय अरुंद बोळ लागले आणि आमची (हॉटेलची :-)) प्रशस्त गाडी अक्षरश: दोन्ही बाजूंच्या घर-दुकानांना स्पर्श करून जात आहे असं वाटायला लागलं.

शिवाय या बोळांतून माणसं चालत होतीच. फक्त हे बोळ एक-दिशा-मार्गी (one way) असल्याने त्यातल्या त्यात हायसं वाटलं. मी मुंबईत जन्मलेली-वाढलेली असून आणि मुंबईतल्या ट्रॅफिक-ड्रायव्हिंगची सवय असूनही हा अनुभव थरारक वाटला. मुंबईतल्या ट्रॅफिक-ड्रायव्हिंगचा धसका घेतलेली माझी मुलंसुद्धा म्हणाली की इथे गाडी चालवणं मुंबईपेक्षाही कठीण दिसतंय. पण हा अनुभव आवडला देखील.

अशाच एका बोळात एका ठिकाणी आम्ही उतरलो. इथून एका छोट्या फाट्यावर वळून आमच्या हॉटेलच्या आवारात शिरलो.  तिथेही परत आमचं अतिशय अगत्यशीलपणे स्वागत झालं. त्यांनी आम्हा सर्वांना त्यांचा पेरुव्हियन पद्धतीचा कोका नावाच्या वनस्पतीच्या पानांचा चहा दिला. तो मात्र काढ्यासारखा लागत असल्याने आम्हाला पिववेना. आधी रस्त्यांवर पाहिलेल्या हॉटेल्सप्रमाणेच आमचं हे हॉटेल 'बुटिक कासा सान ब्लास' आणि त्यातली आमची suite देखील लहानच वाटली. अर्थात तरीदेखील हॉटेल आणि खोली चांगली, नीटनेटकी आणि स्वच्छ होती. स्टाफ अगत्यशील आणि कार्यतत्पर होता. खोलीदेखील तशी आमच्यासाठी पुरेशी मोठी होती. तीन मोठे पलंग होते. टेबल-खुर्च्या होत्या. बाहेर उघडा पॅसेज होता, त्यामुळे खोलीबाहेर आल्यावर कुस्कोचा सुंदर देखावा दिसे.



३ पलंग असलेली खोली



खोलीबाहेरच्या परोजमधून दिसणारा कुस्कोचा देखावा



किचनेट

किचनही तसं छोटेखानीच होतं. मायक्रोवेव्ह, टोस्टर, मिक्सर, छोटा फ्रिज वगैरे होतं, पण इलेक्ट्रिक स्टोव्ह असल्याने आणि मला त्याची सवय नसल्याने नंतर एकदा साधं मॅगी करणं देखील कठीण गेलं. पूर्वी आम्ही एक-दोन ठिकाणी किचनवाली suite घेतली होती तिकडची किचन घरच्या किचनएवढ्याच आकाराची, गॅस स्टोव्ह असलेली आणि संपूर्ण सुसज्ज अशी होती. इथे मोजून तीन कप्स आणि तीन प्लेट्स होत्या (पापा बेअर, मामा बेअर आणि बेबी बेअरसाठी ?) आणि एक मोठी सुरी होती (गोल्डिलॉकला धमकावण्यासाठी ?). मॅगी करण्यासाठी पातेलं आणि खाण्यासाठी काटे-चमचे मागवावे लागले आणि त्यांनी ते लगेच दिलेही. पण ही अपुरी सामुग्री आणि इलेक्ट्रिक स्टोव्ह पाहून आम्ही तिथे पुन्हा काही शिजवण्याचा विचार सोडून दिला. आणलेले तयार खाद्यपदार्थ ठेवण्यासाठी आणि गरम करण्यासाठी फ्रिज, टोस्टर आणि मायक्रोवेव्हचा मात्र उपयोग झाला.

खोलीत रुम हीटर होता. Central heating नव्हतं. शिवाय रात्री ते hot water bags देत. पहिल्यांदा आम्हाला hot water bags चं प्रयोजन कळेना. दुसऱ्या कुठल्या रुममधल्या कुणाची पाठ वगैरे दुखत असल्याने त्यांनी मागवल्या असतील आणि स्टाफने चुकून आमच्या रुममध्ये पाठवल्या असतील असं आम्हाला वाटलं. म्हणून front desk ला फोन करून विचारल्यावर त्यांनी सांगितलं की रात्री त्या बिछान्यात ठेवल्या की उबदार वाटतं. आणि खरोखरच तसं वाटलं. अर्थात न्यू जर्सीच्या हिवाळ्यातून पेरूला गेल्यामुळे, आम्हाला तिथे काही फार थंड वाटत नव्हतं. रुममधला तो हीटर आणि रात्रीच्या त्या hot water bags ह्यामुळे खोलीतलं तपमान अगदी comfortable होतं.

बाहेर सरासरी तपमान दिवसा ६५ डिग्री फॅरन्हाईट (१८-२० डिग्री सेल्सिअस) आणि रात्री ४५-५० डिग्री फॅरन्हाईट (८-१० डिग्री सेल्सिअस) होतं. कुस्को, माचु पिचू, ओलॅण्टीटॅम्बो या डोंगराळ भागांत (उंचीमुळे) साधारण वर्षभर असंच तपमान असतं. पेरू दक्षिण गोलार्धात असल्याने डिसेंबर ते एप्रिलच्या मध्यापर्यंत इथे उन्हाळा असतो पण तेव्हाच पेरूच्या डोंगराळ भागांत पाऊसही असतो. त्यामुळे कुस्को, माचु पिचू सारख्या ठिकाणी यायचा उत्तम सीझन म्हणजे एप्रिलच्या मध्यापासून ते नोव्हेंबरपर्यंत. कारण तेव्हा हिवाळा असला तरी उन्हाळ्यापेक्षा फार कमी तपमान नसतं आणि महत्त्वाचं म्हणजे पाऊस नसतो. जानेवारी-फेब्रुवारीत सर्वाधिक पाऊस असतो. जानेवारी-फेब्रुवारीत माचु पिचूला प्रवासी उंचावर पोहोचले आणि नंतर इतका पाऊस पडला की परत यायचे रस्ते बंद करावे लागले आणि त्यांना airlift करावं लागलं अशा चित्तथरारक कथा आम्ही ऐकल्या होत्या. आम्ही मार्च अखेरीला जात असल्याने इतकी वाईट परिस्थिती असणार नाही हे माहित होतं, परंतु थोडा का होईना, पण सतत पाऊस पडला असता तर आमच्या ट्रिपवर अक्षरश: पाणी पडलं असतं. पण इंकांची सूर्यदेवता आमच्यावर प्रसन्न असावी. आम्हाला निदान बाहेर फिरायच्या वेळी जवळ जवळ कधीच पाऊस मिळाला नाही. बहुतेक वेळा लख्ख सूर्यप्रकाश होता आणि बाहेर फिरण्यासाठी उत्तम हवामान होतं.

डोंगराळ प्रदेशांबद्दल ऐकलेला आणखी एक प्रॉब्लेम म्हणजे जसं जसं उंचावर जावं तसा तसा ऑक्सिजन विरळ होत जातो. मागे हवाईतल्या एका डोंगरमाथ्यावर पोहोचल्यावर मला थोडं गरगरायला झालं होतं. म्हणून मला वाटलं होतं की इथे सुद्धा मला त्रास होईल. पण इथे मला काही न होता बाकी तिघांना मात्र आळीपाळीने तीन वेगवेगळ्या दिवशी थोडं गरगरायला झालं. अशा वेळी कोकाची पानं चघळावी किंवा ती पानं घातलेला (आम्हाला पोचताक्षणी हॉटेलमध्ये दिलेला) चहा घ्यावा असं म्हणतात. (हा कोका वेगळा आणि चॉकलेट करतात ते कोकावचं झाड वेगळं ही माहितीदेखील मिळाली.) आम्ही असं काही केलं नाही. थोड्या वेळ्याने त्या उंचीची आणि ऑक्सिजन पातळीची सवय झाल्यावर परत ठीक वाटतं. म्हणून माचु पिचूला जायच्या आधी निदान एक दिवस तरी कुस्कोला रहावं असं म्हणतात. कुस्को सर्वांत जास्त उंचीवर आहे (१०,०००-११,००० फूट). माचु पिचू सात-आठहजार फुटांवर आहे. इथल्या हॉटेल्समध्ये सुद्धा गरज पडल्यास ऑक्सिजनची नळकांडी पुरवतात. सुदैवाने आम्हाला त्याची काही

गरज पडली नाही. हॉटेलचे जिने चढताना (लिफ्ट/एलिव्हेटर नव्हती) धाप मात्र लागायची. शिवाय आम्ही नेलेली मॅगीची आणि चिप्सची पाकिटं टम्म फुगली होती, ती ह्या altitude मुळे की इतर कशामुळे कोण जाणे.




पहिल्या दिवशी आम्ही कुस्कोला हॉटेलमध्ये सकाळी साधारण ९:३०-९:४५ ला पोहोचलो. थोडं फ्रेश होऊन, सामान लावून, आराम करून, १२ च्या सुमाराला लंचसाठी आणि सभोवतालचा परिसर पायी फिरून पाहण्यासाठी आम्ही बाहेर पडलो. दुकानं, रेस्टराँट्स वगैरे असलेला मुख्य चौक (सान ब्लास प्लाझा), हॉटेलपासून साधारण १०-१५ मिनिटं चालण्याच्या अंतरावर होता. आधी पाहिलेल्या अरुंद बोळांतूनच आम्ही चालत जात होतो. मोठ्या गाड्या आल्या की अंग चोरून बाजूच्या घरा-दुकानाच्या भिंतीला चिकटून चालत होतो. बहुतेक टुरिस्ट लोकच रस्त्यात फिरत होते. स्थानिक लोक दुकानात किंवा रस्त्यावर काही ना काही विकताना किंवा काम करतानाच दिसत होते. पारंपारिक रंगीबेरंगी कपडे घातलेले थोडे स्थानिक लोक मात्र (कदाचित वातावरणनिर्मितीसाठी) रस्त्यावर फिरत होते. एकंदरीत अगदी प्रसन्न वाटत होतं. छोटी छोटी दुकानं लागत होती. कुठल्याही पर्यटनस्थळी असतात तशी souvenirs ची आणि स्थानिक लोकांच्या हस्तकलेच्या वस्तू विकाणारी बरीच दुकानं होती. मुख्य चौक चांगला मोठा होता. त्याच्या सभोवती दुकानं, रेस्टराँट्स आणि एक मोठं कॅथिड्रल होतं ज्यातली कुझ्क्विनो पेंटिंग्ज फार प्रसिद्ध आहेत असं म्हणतात.



प्लाझाला पोहोचल्यावर आम्ही कुठल्या रेस्टराँटमध्ये जावं ते पाहू लागलो. (आमच्या हॉटेलचं रेस्टराँट फक्त ब्रेकफास्टसाठी उघडं होतं. एप्रिलनंतरच लंच आणि डिनर सुरू होणार होतं. काँटिनेंटल पध्दतीचा ब्रेकफास्ट मोफत होता आणि चांगलाही होता.) मुलांना इटालियन किंवा मेक्सिकनच खायचं होतं. पेरूत bottled water च प्यावं आणि शिजवलेलंच खावं असं वाचलं होतं. त्यामुळे मारियाला चांगल्या रेस्टराँट्सची नावं विचारूनच निघालो होतो. मात्र तिथे पेरुव्हियन छापाचंच इटालियन/मेक्सिकन/चायनीज म्हणजे थोडक्यात फ्युजन खाणं मिळेल असं ती म्हणाली. दुकानांची आणि रेस्टराँट्सची नावं वाचता वाचता 'सूर्य-चंद्र' असं मोठ्या अक्षरांत लिहिलेला बोर्ड दिसला. हे भारतीय रेस्टराँट आहे की काय म्हणून जवळ जाऊन बोर्ड वाचला तर ते भारतीय पद्धतीच्या मसाजचं पार्लर होतं आणि बोर्डवर ऐश्वर्या रायचं चित्र होतं. चौकात मॅकडॉनल्ड होतं, पण सगळ्यांनी तिथे खाण्यास साफ नकार दिला. मग मारियाने सांगितलेल्या एका इटालियन रेस्टराँटमध्ये पेरुव्हियन छापाचा पास्ता-पिझ्झा, वगैरे खाल्लं. चव वेगळी असली तरी सगळं जेवण रुचकर होतं.

मग हॉटेलमध्ये परतून जरा आराम केला. दुपारी दोन वाजता आमची कुस्को शहराची चार तासांची टूर सुरू होणार होती. बरोबर वेळेवर आमची ठरलेली गाडी, ड्रायव्हर आणि रेने नावाचा गाईड आला. त्याने आम्हाला पहिल्यांदा सान ब्लास प्लाझा आणि कॅथिड्रललाच नेलं, पण आम्ही सकाळी तिथे फिरलो असल्याचं सांगितल्यावर तिथे न उतरता तो सरळ आम्हाला सॅक्सायवामान आर्किओलॉजिकल पार्कला घेऊन गेला. ही जागा एका उंच टेकडीवर आहे. पण बऱ्याच वरपर्यंत गाडी जाते. पार्कच्या बाहेर उतरून आम्ही आत जात होतो तेवढ्यात आम्हाला काही प्राणी दिसले. आम्हाला ते लामा वाटले, पण ते अल्पाका आणि विकुन्या नावाचे प्राणी होते. त्यांच्या लोकरीपासून कपडे बनवतात. त्यांच्याबरोबर फोटो घेऊन आम्ही पार्कमध्ये शिरलो.



अल्पाका



विकुन्या

सॅक्सायवामान आर्किओलॉजिकल पार्कमध्येही माचु पिचूप्रमाणेच इंका संस्कृतीचे अवशेष आहेत. कुस्को तर इंकांची राजधानीच होती. इथे उत्खनन करणाऱ्या संशोधकांच्या मते ह्या भागात कमीत कमी हजार वर्षांपूर्वीपासून मानवी वस्ती होती. साधारण इ.स. १२०० पासून इंका समाज इथे राहू लागला. इ.स. १४४२ पर्यंत तर पाचाकुटेकच्या नेतृत्वाखाली इंकांचं साम्राज्य कुस्को आणि आजूबाजूच्या बऱ्याच भागांत (माचु पिचू, ओलॅण्टीटॅम्बो, इ.) पसरलं. पण नंतर इ.स. १५३०-३३ च्या दरम्यान वरच्या भागांत राहणाऱ्या आणि खालच्या भागांत राहणाऱ्या इंकांच्या दोन गटांमध्ये अंतर्गत यादवी युध्द सुरू झालं. हॉस्कार आणि आथ्वाल्पा हे दोन भाऊच एकमेकांविरुध्द उभे ठाकले होते आणि या दोन गटांचं नेतृत्व करत होते. (काही नवीन वाटत नाही ना ?) नेमकं याच दरम्यान फ्रान्सिस्को पिझार्रोच्या नेतृत्वाखाली स्पॅनिश लोकांनी या भागात आक्रमण केलं. इंकांच्या दोन गटांतली यादवी त्यांच्या पथ्यावरच पडली आणि त्यांनी या भागावर हळूहळू कब्जा मिळवला. इ.स. १५४२ पर्यंत तर त्यांनी इंकांचा पूर्णत: पाडाव करून इथे स्पॅनिश वसाहत स्थापन केली ती एकोणीसाव्या शतकापर्यंत टिकली. इ.स. १८१० ते इ.स. १८२४ मध्ये स्पेनविरुध्द स्वातंत्र्यलढा झाला आणि अखेरीला इ.स. १८७९ मध्ये पेरू स्वतंत्र झालं. कित्येक वर्षं कुणालाही इंका संस्कृतीच्या अवशेषांबद्दल काहीही माहिती नव्हतं. खुद्द स्पॅनिश लोकांना सुध्दा माचु पिचू वसाहत सापडलीच नव्हती. अखेर इ.स. १९११ मध्ये हिराम बिंगहॅम नावाच्या संशोधक प्रवाशाला माचु पिचूच्या इंका वसाहतीचे अवशेष सापडले. त्याच्या नावाची एक लक्झरी ट्रेन माचू पिचूला जाते.



**सॅक्सायवामान भागात इंकांनी बांधलेली प्रचंड भिंत**

कुस्कोचा सॅक्सायवामान भाग म्हणजे इंकांचा किल्लाच होता. सोळाव्या शतकात (यादवी आणि स्पॅनिश आक्रमणाच्या दरम्यान) इथे बऱ्यापैकी लढाई झाली होती. स्पॅनिश आक्रमणाच्या पूर्वी इथे बुरुज होते, बरीच कोठारं होती आणि इतरही छोट्या-मोठ्या इमारती/वास्तू होत्या. एक सूर्यमंदिर आणि मोठ्ठं मोकळं आवारही होतं. म्हणजे तिथे धार्मिक विधी होत असावेत. इथेच एका chamber मध्ये विसाव्या शतकात mummies ही सापडल्या होत्या. स्पॅनिश लोकांनी हे सर्व तोडून, त्यांतले दगड वापरून आपल्या वसाहतींमध्ये घरं बांधली. आता फक्त अवशेष उरले आहेत आणि भल्या मोठ्या (तटबंदीच्या) तीन भिंती अजून आहेत. ह्या भिंतींची उंची ६ मीटर्स आहे आणि सगळ्यात लांब भिंतीची लांबी ४०० मीटर्स आहे. ह्या भिंतींचं वैशिष्ट्य म्हणजे त्यांत वापरलेले बहुतेक दगड हे प्रत्येकी १२० ते २०० टन वजनाचे आहेत. हे एकमेकांवर आणि एकमेकांशेजारी कुठल्याही सिमेंट/चुना/mortar सारख्या पदार्थाविनाच इतक्या अचूकतेने जोडलेले आहेत की त्यांच्यामधून एखादा पातळ कागद देखील जाऊ शकणार नाही. ह्या अशा रचनेमुळेच म्हणे १९५० साली कुस्कोत झालेल्या भूकंपात देखील ह्या भिंतींना काहीही इजा पोहोचली नाही. स्पॅनिश लोकांनाही ह्या भिंती तोडता आल्या नसाव्यात किंवा एवढे मोठे दगड तिथून हलवता आले नसावेत, म्हणूनच त्या टिकल्या असाव्यात असं म्हणतात. मुळात इंका लोकांनी देखील ते कसे ओढत आणले असतील कल्पना करवत नाही. ते तर म्हणे चाकही वापरत नव्हते.




ह्या भिंती, अवशेष बघत, पायऱ्या चढत आम्ही थोडे वर गेलो. तिथून समोर डोंगर आणि त्यांच्या पायथ्याशी कुस्को शहराचा अतिशय सुंदर view दिसत होता. (सॅक्सायवामान भाग व कुस्को शहर मिळून प्युमा या प्राण्याचा आकार होतो म्हणतात. त्यांपैकी सॅक्सायवामान भाग हा प्युमाच्या डोक्याच्या आकाराचा आहे म्हणे. कंडोर, प्युमा आणि सर्प हे इंका संस्कृतीत तीन जगांचं प्रतीक मानतात. त्यांपैकी प्युमा म्हणजे इहलोक.) एका डोंगरावर हिरवळीमध्ये अक्षरांचे आकार कापून Peru, Cusco वगैरे लिहिलं होतं. आमच्या हॉटेलच्या खोलीबाहेरच्या पॅसेजमधूनदेखील हे दिसायचं पण फार लांब वाटायचं. इथून ही अक्षरं अगदी स्पष्ट दिसत होती. तसंच डाव्या बाजूला आणखी एका छोट्या टेकडीवर असलेला White Christ चा पुतळाही दिसत होता. १९४५ मध्ये कुस्कोत आश्रयाला आलेल्या ख्रिस्ती पॅलेस्टिनी लोकांनी परत जाताना आभारप्रदर्शनार्थ हा पुतळा कुस्को शहराला भेट दिला.



इथून रेनेने आम्हाला कुस्कोतलं सूर्यमंदिर पहायला नेलं. वाटेत बरीच निलगिरीची झाडं दिसत होती.

छोटी छोटी घरं लागत होती. बहुतेक घरांवर सजावटीसाठी चित्रं काढली होती. बऱ्याच घरांवर ख्रिस्ती क्रॉस होते. स्पॅनिश लोकांनी इथे ख्रिस्ती धर्म पूर्णपणे रोवला. काही मूठभर natives मात्र अजूनही पूर्वीच्या धार्मिक चाली-रीतीरिवाज पाळतात. सूर्यमंदिराच्या जागी आता त्या मंदिराचे अवशेष, एक स्पॅनिश चर्च, बाग आणि एक आर्ट गॅलरी आहे. इथे इंकांच्या कल्पनेतील तारे, ग्रह, नक्षत्रांचं एक भिंतीचित्र (mural) आहे.

बाकी कुस्को शहरात थोडं फिरवून टूरच्या शेवटी रेने आम्हाला एका दुकानात घेऊन आला. सॅक्सायवामान आर्किओलॉजिकल पार्कच्या बाहेर पाहिलेल्या अल्पाका आणि विकुन्या या प्राण्यांची लोकर अतिशय मऊ आणि उबदार असते. आणि अर्थातच महाग असते. विकुन्याची लोकर सर्वात महाग, त्याच्या खालोखाल बेबी अल्पाकाची आणि मग अल्पाकाची. (बाहेर नकली अल्पाका लोकरीचे कपडे मिळतात त्यांना maybe alpaca म्हणतात. :-)) दुकानाबाहेर त्यांनी या लोकरींच्या कपड्यांचे आणि वस्तूंचे नमुने लावले होते. त्यांना हात लावल्या लावल्याच त्यांचा दर्जा लक्षात आला. बाहेरच्या कुठल्या दुकानापेक्षा इथे हे कपडे/वस्तू स्वस्त मिळतील असं रेने म्हणाला. मागे आग्र्याला ताज महाल पाहिल्यावर तिकडचा गाईडदेखील ताजसाठी वापरलेल्या संगमरवराच्या आणि मौलिक खड्यांच्या वस्तूंच्या अशाच दुकानात घेऊन गेला होता त्याची आम्हाला आठवण झाली. एरवी इतर पर्यटनस्थळी आम्ही जेमतेम मॅग्नेट, पोस्टकार्ड्स अशी फुटकळ खरेदी करणारी माणसं, आग्र्याच्या त्या दुकानातल्या संगमरवरी वस्तूंची चांगलीच भुरळ पडल्यामुळे खिसा बराच हलका करून आलो होतो. बाहेरच्या पेक्षा या दुकानांमध्ये खरोखरच कमी किंमत असली तरी इथे देखील मूळात या वस्तूंची किंमत बरीच असते. कुस्कोच्या या दुकानात आग्र्याच्याच प्रकाराची पुनरावृत्ती होणार या काहीशा भीतीनेच आम्ही आत शिरलो. पण सुदैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा आम्हाला आतल्या कपड्यांची रंगसंगती विशेष आवडली नाही. (होते मात्र खरोखरच अफलातून मऊ-मुलायम आणि अतिशय उबदार !) त्यामुळे फक्त मुलांनी हातमोजे, पायमोजे घेतले आणि आम्ही नेहमीसारखी मॅग्नेट, पोस्टकार्ड्स, souvenirs ची किरकोळ (आणि स्वस्त) खरेदी करून बाहेर पडलो.

(भाग १ समाप्त. भाग २ - जुलै २०११ च्या अंकात.)

**- नीता नाबर**

## अधिक माहिती:

**विमान तिकिटं व हॉटेल बुकिंग साठी वेबसाईट्स:**
www.travelocity.com
www.expedia.com

www.kayak.com
www.orbitz.com
www.hotels.com

**पेरूतील टूर्ससाठी वेबसाईट्स:**
http://www.viator.com/Peru/d927-ttd
http://www.graylinevacations.com/Peru_Lima/Modern_and_Cultural_Lima_City_Tour
http://www.google.com/#sclient=psy&hl=en&source=hp&q=peru+tours&aq=f&aqi=g5&aql=&oq=&pbx=1&bav=on.2,or.r_gc.r_pw.&fp=3630020dd2414e1d&biw=1024&bih=685

आम्ही मात्र हॉटेलमधूनच सगळ्या (लिमा सोडून. ती www.grayline.com वरून घेतली.) टूर्स घेतल्या. ह्या खाजगी टूर्स असूनही इतर वेबसाईट्सवरच्या पब्लिक टूर्सइतकीच किंमत पडली. हॉटेल रुम सुध्दा डायरेक्ट हॉटेलशी (वेबसाईटवरून किंवा फोनवरून) संपर्क साधून घेतली असती तर रुमची किंमत इतर वेबसाईट्ससारखीच पडली असती आणि शिवाय एक टूर मोफत मिळाली असती.
स्वत:हून रेल्वे तिकिट काढून फिरायचं असल्यास:
https://www.perurail.com/en/
माचु पिचूला जायला तीन प्रकारच्या ट्रेन्स असतात. हिराम बिंगहॅम नावाची लक्झरी ट्रेन असते. ती चांगलीच महाग असते. दुसऱ्या दोन ट्रेन्स म्हणजे - १. व्हिस्ता डोम आणि २. बॅकपॅकर किंवा एक्सपिडीशन. (बहुतेक टूर्समध्ये हेच दोन पर्याय असतात.) त्यांपैकी व्हिस्ता डोम जराशी महाग असते कारण तिच्या छतावर खिडक्या असतात. पण आम्ही नंतर स्टेशनमध्ये पाहिलं तर व्हिस्ता डोम आणि बॅकपॅकर सारख्याच दिसल्या. दोघींच्याही छतावर सारख्याच खिडक्या होत्या. फक्त व्हिस्ता डोम मधल्या सीट्स लेदरच्या होत्या, तर बॅकपॅकर मध्ये कापडी कव्हरवाल्या.

**जाण्याचा उत्तम सीझन:**
डोंगराळ प्रदेशात वर्षभर साधारण सारखंच तपमान असतं. त्यामुळे कुस्को, माचु पिचू, ओलॅण्टिटॅम्बो सारख्या डोंगराळ प्रदेशात जायचा उत्तम सीझन म्हणजे एप्रिलच्या मध्यापासून ते नोव्हेंबरपर्यंत. कारण तेव्हा दक्षिण गोलार्धात हिवाळा असला तरी उन्हाळ्यापेक्षा फार कमी तपमान नसतं आणि महत्त्वाचं म्हणजे पाऊस नसतो. दक्षिण गोलार्धातील उन्हाळ्यात, म्हणजे डिसेंबर ते एप्रिलच्या मध्यापर्यंत पाऊस असतो. जानेवारी-फेब्रुवारीत सर्वाधिक पाऊस असतो.
लिमासारख्या समुद्रसपाटीला असलेल्या ठिकाणी मात्र उन्हाळ्यात हिवाळ्यापेक्षा जरा जास्त तपमान असतं. आणि लिमात पाऊस अजिबातच नसतो म्हणे. त्यामुळे लिमासारख्या ठिकाणी जायचा चांगला सीझन म्हणजे दक्षिण गोलार्धातील उन्हाळा म्हणजे डिसेंबर ते एप्रिल.

**पेरूचं चलन:**

Nuevo Sol हे पेरूचं चलन आहे.

१ Nuevo Sol = १०० centimos

आणि साधारण १ US Dollar = २.७६ Nuevo Sol (२०११ मध्ये).

विमानतळ, चांगली हॉटेल्स, रेस्टरॉंट्स, मोठी दुकानं, मॉल्स इथे क्रेडिट कार्ड्स चालतात. मात्र पासपोर्ट दाखवावा लागतो. रेस्टरॉंट्समध्ये तर पासपोर्ट दाखवल्यावर टॅक्स पडत नाही. छोट्या दुकानांमध्ये, रस्त्यावरच्या विक्रेत्यांकडे मात्र सोल्सच द्यावे लागतात. हॉटेलमधल्या लोकांना किंवा गाईडला टिप्स डॉलर मध्ये दिली तरी चालते, पण रेस्टरॉंट्स, स्वच्च्छतागृह वगैरे ठिकाणच्या टिप्सना सोल्स लागतात. का कोण जाणे, पण डॉलरच्या नोटा त्यांना करकरीत लागतात. सोल्सबाबत तसा आग्रह नसतो.